**रे.दि.मु.क्र.७२६/२०२३**
**अशोक सिताराम सुळके वगैरे**
**वि.**
**विनायक भिकु जंगम वगैरे**

**रे.दि.मु.नं.७२६/२०२३ मधील निशाणी २० खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र. १ ते ७ व १० यांचेविरुद्ध विनाकैफियत झालेला आदेश रद्द होवुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, सदर कामातील प्रतिवादी यांना नोकरीच्या ठिकाणी बाहेरगावी जावे लागते त्यामुळे त्यांना कैफियत देणेकामी आवश्यक ते कागदपत्रे गोळा करणेसाठी वेळ देता आला नाही. तसेच रेव्हन्यु खात्याकडे अर्ज दिलेनंतर काही वेळा संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याने दाखले व कागदपत्रे मिळण्यास उशीर झाल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत देऊ शकले नाही.प्रतिवादीच्या घराकडे जाणारे एकमेव रस्त्याबाबत वादीनी वाद निर्माण केला असुन प्रतिवादी यांची कैफियत रेकॉर्डला येऊन त्यांचे म्हणणे विचारात घेऊन गुणावगुणावर निर्णय होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्याने प्रतिवादींविरुद्ध विनाकैफियत झालेला आदेश रद्द होवुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. उलटपक्षी वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन, प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज खोटा व लबाडीचा असुन प्रतिवादीने योग्य व सबळ कारण दिले नाही. प्रतिवादींना न्यायालयाने पुरेशी संधी दिली होती तरीही दाव्याचे कामकाज लांबविणेकरीता मुद्दाम उशीर केला असल्याने सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. अर्ज मंजुर करणे झालेस प्रतिवादींना प्रत्येकी ५००/– रुपये कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द जाहीर ठराव व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र १ ते ३ व ७ यांना दि. ०४.११.२०२३ रोजी समन्सची बजावणी झाली असुन ते दि. ०१.१२.२०२३ रोजी दाव्याच्या कामी हजर झाले आहे. तसेच प्रतिवादी क्र ५, १० यांना समन्सची बजावणी दि.

०६.०९.२०२३ रोजी झाली असुन ते दाव्याच्या कामी दि. ३०.०९.२०२३ रोजी हजर झाले आहे. त्यांना कैफियत दाखल करणेस साधारणतः ९ ते १० महिन्यांचा विलंब झालेला आहे. परंतु सदरचा उशीर हा नमुद कारणामुळे झाला असलेला दिसुन येतो. परंतु नमुद कारणासंदर्भात प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जात नमुद कारणांचा विचार करीता तसेच दावा गुणदोषावर चालविण्यासाठी व दाव्याच्या निर्णयासाठी प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. कैफियत दाखल करुन घेतले नाहीतर प्रतिवादींचे अपिरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातुन प्रतिवादींना त्यांची बाजु मांडण्यासाठी कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य राहील. तथापि, सदर विलंबामुळे दाव्याच्या प्रगतीस विलंब झाला आहे. त्यामुळे प्रतिवादींवर खर्च लादून कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. १ ते ७ व १० यांचा नि. २० चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. त्यांचेवर एकत्रितरीत्या खर्च रक्कम रुपये ८००/–(आठशे रुपये मात्र) लादून विनाकैफियत झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

४. प्रतिवादींनी पुढील तारखेपर्यंत लादलेली खर्चाची रक्कम जमा न केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

PRAJAKTA GAJANAN SHELAR
Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2024.10.08 16:03:03 +0530

स्थळ – कराड (पी. जी. शेलार)

दिनांक–०८.१०.२०२४ ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड